पोलीस आयुक्तालय
मिरा-भाईंदर,वसई -विरार
सेक्टर ०५, रामनगर, शांती गार्डन, मिरारोड (पुर्व), ठाणे -४०११०७
Email ID-cpoffice.mb-vv@mahapolice.gov.in

जा.क्र./वि.शा./कोरोना/मनाई आदेश/१७४२ /२०२१ दिनांक :- २२/०४/२०२१

वाचले:-

१) फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ चे कलम १४४ (१) (३).
२) भारतीय साथरोग प्रतिबंधक अधिनियम १८९७.
३) आपत्ती व्यवस्थापन कायदा सन २००५.
४) महसुल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्रं. डीएमयु/२०२०/सीआर ९२/आपत्तीव्यवस्थापन -१ दिनांक १५/०३/२०२१.
५) महसुल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्रं. डीएमयु/२०२०/सीआर ९२/आपत्तीव्यवस्थापन -१ दिनांक १७/०३/२०२१.
६) महसुल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्रं. डीएमयु/२०२०/सीआर ९२/आपत्तीव्यवस्थापन -१ दिनांक २७/०३/२०२१.
७) महसुल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्रं. डीएमयु/२०२०/सीआर ९२/आपत्तीव्यवस्थापन -१ दिनांक ०४/०४/२०२१.
८) महसुल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्रं. डीएमयु/२०२०/सीआर ९२/आपत्तीव्यवस्थापन -१ दिनांक १३/०४/२०२१.

आदेश :-

**फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश.**

ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला कोरोना आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषीत केलेला आहे. तसेच कोरोना विषाणुंचा प्रसार भारतात, महाराष्ट्रात व मिरा-भाईंदर, वसई-विरार शहरात गतीने पसरत असल्याचे दिसुन येत आहे. तसेच राज्य शासनाने कोरोना विषाणु (कोविड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथीचा रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० रोजीपासुन लागू करण्यात आला असून त्यातील खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमीत केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासन नोटीफिकेशन क्रमांक डीएमयु/२०२०/सीआर ९२/आपत्तीव्यवस्थापन -१ दिनांक १३/०४/२०२१ अन्वये दिंनाक ०१/०५/२०२१ पर्यंत लॉक डाऊन आदेश लागु केलेला आहे. त्याअनुषंगाने तात्काळ प्रतिबंधक उपाययोजना म्हणुन फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ चे कलम १४४ (१) (३) प्रमाणे जनतेस, खालील व्यक्ती, आस्थापना यांना उद्देशुन आदेश काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी **विजयकांत सागर**, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय मला प्रदान करण्यात आलेल्या शासनाच्या क्र.पीआरओ-०९२०/प्रक्र २१७/विशा-२- फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (सन १९७४ चा २) च्या कलम २१ नुसार प्राप्त विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (३) अन्वये, मनाई आदेश दिनांक १४/०४/२०२१ रोजीचे २०.०० वा. ते दिनाक ०१/०५/२०२१ रोजीचे ०७.०० वा. दरम्यान लागू करण्यात आलेला आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रात कोरोना विषाणुचा वाढता प्रभाव लक्षात घेता शासनाने नव्याने निर्बंध लागु केले असुन त्याबाबत पुढील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**कार्यालयीन उपस्थिती :-**

१. सर्व शासकीय कार्यालया (राज्य, केंद्र वस्थानिक प्राधिकरण अंतर्गत) मध्ये १५ टक्के उपस्थिती राहू

Scanned by CamScanner

शकेल. कोव्हिड-१९ महामारी व्यवस्थापनाशी प्रत्यक्ष सलग्न असणाऱ्या सेवा वगळण्यात आलेले आहेत.

अ) मुंबई व महानगर भागातील मंत्रालय व केंद्र शासनाच्या कार्यालयांच्या बाबतीत संबंधीत खात्यातील विभाग प्रमुख महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडुन परवानगी प्राप्त करुन उच्च उपस्थितीसाठी निर्णय घेवु शकतात.

ब) इतर शासकीय कार्यालयाच्या बाबतीत कार्यालय प्रमुख उच्च उपस्थिती करीता स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडुन परवानगी प्राप्त करुन निर्णय घेवु शकतील.

२. इतर सर्व कार्यालय हे त्यांच्या पुर्ण क्षमतेच्या १५ टक्के उपस्थितीने किंवा ५ कर्मचारी या पैकी जे जास्त असेल ते या प्रमाणे कार्यरत राहतील.

३. अत्यावश्यक सेवेशी निगडीत इतर सर्व कार्यालय त्यांच्या क्षमतेच्या कमीतकमी काम करतील व कुठल्याही परिस्थितीत ५० टक्के पेक्षा जास्त क्षमता राहणार नाही. प्रत्यक्षपणे अत्यावश्यक सेवा पोहोच करणारे कर्मचारी देखील कमी करावे परंतु आवश्यकता असल्यास त्यांची उपस्थिती १०० टक्के पर्यंत वाढवली जावु शकते.

**विवाह सभारंभ :-**

विवाह सभारंभाचे आयोजन एका सभागृहात केले जावे व त्यामध्ये जास्तीत जास्त २५ व्यक्ती उपस्थित राहु शकतील व दोन तासापेक्षा जास्त वेळ सदर सभारंभ चालणार नाही.

**खाजगी प्रवासी वाहतुक :-**

अ) बसेस वगळता खाजगी प्रवासी वाहतुक केवळ आपत्कालीन किंवा आवश्यक सेवांसाठी चालकासह वाहनाच्या ५० टक्के क्षमतेने वैध कारणांसाठी चालु राहतील. खाजगी वाहने आंतरजिल्हा किंवा आंतर शहर प्रवास करु शकणार नाही व प्रवासी त्यांच्या राहते शहरातच प्रवास करु शकतील. आपत्कालीन परिस्थितीत किंवा अंत्यविधी सारख्या किंवा कुंटुबातील गंभीर अजारपणात भाग घेण्यासाठी आवश्यकता भासल्यास अंतरजिल्हा किंवा अंतरशहर प्रवासात परवानगी आहे.

ब) खाजगी बसेस आसन क्षमतेच्या ५० टक्के क्षमतेने वाहतुक करु शकतील. बसेस मध्ये कोणीही उभे राहुन प्रवास करण्यास मनाई राहिल.

क) खाजगी बसेस द्वारे आंतर शहर किंवा आंतरजिल्हा प्रवास खालील अटीशी अधीन राहिल.

१) बस सेवा चालक शहरातील थांब्यांची (STOP) संख्या दोन पेक्षा जास्त ठेवणार नाही. सदर बाबत स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास वेळा पत्राकाबाबत माहिती देतील.स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सदर वेळा पत्रकामध्ये इच्छेनुसार बदल करतील.

२) ज्या स्थानकात प्रवासी उतरतील तेथे सदर प्रवाशांना १४ दिवसांकरीता गृहविलगीकरण करण्याबाबत शिक्का मारावा.

३) प्रवाशांना शिक्का मारणे बाबतची जबाबदारी बस सेवा चालकाची असेल.

४) थर्मल स्कॅनरचा वापर करुन लक्षणे असलेल्या व्यक्तीस रुग्णालय किंवा कोरोना निगा केंद्रे येथे दाखल करतील.

५) स्थानीक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अशा सेवा देणाऱ्या अधिकृत प्रयोगशाळा चालकाकडुन सेवा उपलब्ध करुन प्रवाशी उतरणाऱ्या स्थानकावर कोविड चाचणी करण्याबाबत निर्णय घेतील.

६) स्थानीक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण विशिष्ट ठिकाणावरुन येणारे बसेस करीता शिक्का मारण्याबाबतचे नियम शिथील करु शकतात.

**सार्वजनिक प्रवासी वाहतुक :-**

१. केवळ खालील नमुद श्रेणीतील व्यक्तींना लोकल ट्रेन, मेट्रो ट्रेन किंवा मोनो रेल सेवा (लांब पल्याच गाडया वगळता) चा प्रवासा करीता वापर करता येईल.

अ) सर्व शासकीय कर्मचारी श्रेणीतील (राज्य, केंद्र, स्थानिक प्राधीकरण) कर्मचाऱ्यांच्या शासकीय ओळखपत्राच्या आधारावरच तिकिट किंवा पास दिला जावा.

Scanned by CamScanner

ब) सर्व वैद्यकीय कर्मचारी (डॉक्टर, वैद्यकीय सेवेशी सलग्न सेवा, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, रुग्णालय आणि वैद्यकीय सेवा कर्मचारी ई.) या श्रेणीतील कर्मचाऱ्यांना त्यांच्या संबंधित वैद्यकीय संस्थेने देवु केलेल्या ओळखपत्राच्या आधारावरच तिकिट किंवा पास दिला जावा.

क) वैद्यकीय उपचारांची गरज असणारी कोणतीही व्यक्ती किंवा दिव्यांग व्यक्ती व तिच्यासह एका सक्षम व्यक्तीस परवानगी राहिल.

२. राज्य शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीच्या सार्वजनिक बसेस आसन क्षमतेच्या ५० टक्के क्षमतेने वाहतुक करु शकतील. बसेस मध्ये कोणीही उभे राहुन प्रवास करण्यास मनाई आहे.

३. लांब पल्यांच्या रेल्वे गाडया व बसेस द्वारे आंतर शहर किंवा आंतर जिल्हा प्रवास करणे खालील अटींची अधीन राहिल.

अ)स्थानिक रेल्वे अधिकारी किंवा महाराष्ट्र राज्य परिवहन अधिकारी हे ज्या कार्यक्षेत्रात प्रवासी उतरणार आहेत तेथीलस्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास प्रवाशांबाबत सर्व माहिती पुरवतील.

ब) सर्व स्थानकांवर जिथे प्रवासी उतरतील तेथे सदर प्रवाशांना १४ दिवसांकरीता गृहविलगीकरण करण्याबाबत शिक्का मारावा. थर्मल स्कॅनरचा वापर करुन लक्षणे असलेल्या व्यक्तीस रुग्णालय किंवा कोरोना निगा केंद्रे येथे दाखल करतील.

क)स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अशा सेवा देणाऱ्या अधिकृत प्रयोगशाळा चालकाकडुन सेवा उपलब्ध करुन प्रवाशी उतरणाऱ्या स्थानकावर कोविड चाचणी करण्याबाबत निर्णय घेतील. कोव्हिड चाचणी करीता येणारा खर्च निश्चित केल्यास प्रवाशांना करावा लागेल.

ड)स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण विशीष्ट ठिकाणावरुन येणारे बसेस करीता शिक्का मारण्याबाबतचे नियम शिथील करु शकतात.

या आदेशामध्ये अंतर्भुत केलेल्या अटीव्यतिरिक्त इतर सर्व अटी यापुर्वी निर्गमित केलेला दिनांक १३/०४/२०२१ रोजीचा आदेश व त्यापुर्वी शासनाने निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे कायम राहतील.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात सदरचा मनाई आदेश हा दिनांक २२/०४/२०२१ रोजी रात्रौ ०८.०० ते दिनांक ०१/०५/२०२१ रोजी सकाळी ०७.०० वा. दरम्यान लागू राहील.

सदरचा मनाई आदेशाबाबत प्रत्येकास स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसारमाध्यमे, पोलीस स्टेशन, सहा.पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय पोलीस उप आयुक्त कार्यालये यांचे नोटीस बोर्डावर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक २२/०४/२०२१ रोजी दिलेला आहे.

(विजयकांत सागर)
पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय)
मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय.

प्रत:-

१) मा.अपर मुख्य सचिव, गृहविभाग,मंत्रालय, मंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई.
३) जिल्हा माहिती अधिकारी,ठाणे व पालघर यांचेकडे वृत्तपत्रात बातमी म्हणुन प्रसिध्दीसाठी रवाना.
४) पोलीस उपआयुक्त परिमंडळ १,२ व ३. मि.भा.व.वि.
५) सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त. मि.भा.व.वि.
६) सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, मि.भा.व.वि.
७) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई यांचेकडे पुढील प्रसिध्द होणाऱ्या राजपत्रात प्रसिध्दीसाठी.
८) नस्तीकरीता.

Scanned by CamScanner